# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे


| अतिरिक्त संचालक (वैयक्तिक) ०२० - २६०५८९९६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे § ४११००१, दुरध्वनी§ ०२० § २६०५८७३९, २६०५८१३९, २६०५८४७६ Email - dcell9@gmail.com |
|---|---|
| आरोग्य सेवा | जा.क्र. राकुकका /दक्षता/कक्ष-८/न.क्र. - /७६०६६-९६३ /२०१६ दिनांक :- १६.१९.२०१६ |


प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ...........(सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, ..........(सर्व)
वैद्यकिय अधिकारी, महानगरपालिका, ---- (सर्व)
विशेष अधिकारी, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

**विषय** – **कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याअगोदर लाभार्थीस समुपदेशन करुन संमतीपत्रक भरणे, शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयातून लाभार्थी सोडताना समुपदेशन करुन शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड भरणे व शस्त्रक्रियेनंतर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र वाटप करणे, याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सर्व संस्थांप्रमुखांना देणेबाबत...**

**संदर्भ** – Directions given by Hon'ble Supreme Court, dt.14-9-2016

उपरोक्त संदर्भान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे **कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी अर्ज व संमतीपत्रक** (परिशिष्ट-१), **शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड** (परिशिष्ट-३), **कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र** (परिशिष्ट-४), नविन नमुन्यामध्ये सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकिय अधिकारी महानगरपालिका यांना माहे ~~फेब्रुवारी~~ सप्टेंबर २०१६ मध्ये एका वर्षातील अपेक्षित लाभार्थ्यांच्या संख्येनुसार या परिशिष्टांचा आरोग्य संचालनालय, मुंबई मार्फत **पुरवठा करण्यात आला आहे**. आपण आपल्यास्तरावरुन अपेक्षित लाभार्थ्यांच्या संख्येनुसार सर्व संस्थांना या प्रमाणपत्रांचे वितरण केले आहे, याबाबत खात्री करावी. संमतीपत्रक, सूचना कार्ड, प्रमाणपत्र याबाबतचा उपयोग कसा करावयाचा यासाठीच्या सूचना पुढील प्रमाणे –

**समुपदेशन**

लाभार्थीची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सर्व लाभार्थीचे एकत्रितपणे समुपदेशन आरोग्य सेविका, सहाय्यिका, वैद्यकिय अधिकारी यांनी करावे. या समुपदेशनामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया संदर्भातील सर्व माहिती द्यावी.

## शस्त्रक्रियेसाठी निवड

शारिरिक तपासणीमध्ये व प्रशोगशाळा चाचण्यामध्ये सर्व निष्कर्ष स्वाभाविक असणाऱ्या लाभार्थींची निवड शस्त्रक्रियेसाठी करण्यात यावी.

## कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी अर्ज व संमतीपत्रक (परिशिष्ट-१)

- लाभार्थींची शस्त्रक्रियेसाठी निवड झाल्यानंतर सर्व कुटुंब नियोजन पध्दतीची माहिती, शस्त्रक्रियेबाबत संक्षिप्त माहिती, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कायम स्वरुपी पध्दत, या शस्त्रक्रियेमध्ये गुंतागुंत अथवा असफलता नगण्य प्रमाणात होऊ शकते, शस्त्रक्रियेचा लैंगिक क्षमतेवर परिणाम नाही, शस्त्रक्रिया केल्यानंतर शस्त्रक्रिया असफल झाल्यास अथवा दुर्देवाने गुंतागुंत अथवा मृत्यू झाल्यास शासनाची नुकसान भरपाई योजना, बुडीत मजूरीसाठी अर्थिक लाभ, शस्त्रक्रिया केल्यानंतर बुडीत रोजगारासाठी आर्थिक लाभ इत्यादिबाबत माहिती द्यावी.
- ही माहिती लाभार्थ्यांना दिल्यानंतरच कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी अर्ज व संमतीपत्रक (परिशिष्ट-१) हे भरण्यात यावे.
- **कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी अर्ज व संमतीपत्रक (परिशिष्ट-१) या परिशिष्टामधील अ ब क ड इ ई फ ग ह कलमे लाभार्थीस प्रत्यक्ष वाचून दाखवावीत. लाभार्थीस शंका असल्यास शंका निरसन करावी व त्यानंतर संमतीपत्रावर स्वाक्षरी घ्यावी.**
- लाभार्थी अशिक्षित असल्यास त्याचा ठसा व साक्षिदाराची स्वाक्षरी घेण्यात यावी.
- वैद्यकिय अधिकाऱ्याने या संमती पत्रकावर लाभार्थी वैद्यकियदृष्टया तंदुरुस्त आहे, लाभार्थींना सर्व कलमे समजावून सांगितले आहेत व सदर नमुन्याला कायदेशीर दस्ताऐवजाचा अधिकार आहे हे त्यांना समजावून सांगितले आहे व केंद्र शासनाच्या सर्व नियमांचे पालन करुन कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे हे प्रमाणित करुन स्वाक्षरी करावयाची आहे.

## शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड (परिशिष्ट-३)

- सर्व लाभार्थ्यांना शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड त्यांचे देण्यात यावे.
- लाभार्थ्यास शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड दिल्यानंतर लाभार्थी घरी जाताना त्याच्यासोबत जबाबदार प्रौढ व्यक्ती असल्याची खात्री करावी.
- आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांस घरी घेण्यासाठी औषधी (Oral Medicine i.e.Analgesis, Antbiotics and other oral medicines) देण्यात यावीत.
- शस्त्रक्रिया झाल्यानंतर लाभार्थीने पाठपुराव्यासाठी केव्हा परत यावे, शस्त्रक्रियेनंतर आहार काय घ्यावा, दैनंदिन कामे केव्हा सुरु करता येतील, लैंगिक संबंधाबाबतची माहिती, पुरुष नसबंदीनंतर तीन महिन्यानंतर वीर्य तपासणी इत्यादी बाबतची माहिती लाभार्थ्यांना देऊन शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड पूर्णपणे भरावे.
- शस्त्रक्रियेनंतरचा पाठपुरावा आणि तपासणीचा अहवाल यामध्ये वैद्यकिय अधिकाऱ्यांनी पाठपुराव्यानंतर पाठपुराव्याची तारीख, गुंतागुंत असल्यास त्याबाबतची नोंद व केलेली कार्यवाही इ.बाबतचा तपशिल लिहून स्वाक्षरी करावी.

## कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र (परिशिष्ट-४)

- कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे प्रमाणपत्र स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया झाल्यानंतर एक महिन्याने किंवा महिलेला मासिक पाळी आल्यानंतर दयावयाचे आहे.
- पुरुष नसबंदीनंतर ३ महिन्याने (वीर्य तपासणी करण्यात येऊन) कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र द्यावे.
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर लाभार्थ्यांना द्यावयाचा मुशाहिरा देण्यासाठी शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड, आर-३ रजिष्टर मध्ये केलेली नोंद इत्यादी पुरावा गृहित धरण्यात यावा.
- स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करत असताना एका बाजूची अथवा दोन्ही बाजूच्या नलिका सापडल्या नसल्यास याबाबत सुस्पष्ट अभिप्राय केस कार्ड वरती लिहिण्यात यावा, याबाबतची माहिती लाभार्थीस देऊन त्यांची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेण्यात यावा. अशा लाभार्थ्यांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमापत्र देण्यात येऊ नये व हे लाभार्थी "कुटुंब नियोजन नुकसान भरपाई" योजनेअंतर्गत असफल शस्त्रक्रियेसाठी पात्र रहाणार नाहीत.

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार सेवा देण्यासाठी लाभार्थीचे समुपदेशन करुन संमतीपत्रक भरण्यात यावे. रुग्णालयातील लाभार्थींना सोडताना सर्व सूचना देऊन सूचना कार्ड देण्यात यावे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र वाटप करावे. याबाबतच्या सूचना आपण आपल्या अधिनस्त असणाऱ्या सर्व संस्था प्रमुखांना द्याव्यात व या बाबतची कार्यवाही होत आहे याची खात्री करावी. सोबत परिशिष्टांचे नमुने जोडण्यात येत आहे.

परिशिष्ट-१ - कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी अर्ज आणि संमतीपत्रक
परिशिष ट-३ - शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे सूचना कार्ड
परिशिष्ट-४ - कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रमाणपत्र

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण, पुणे-१.**

प्रत सविनय सादर:

१) मा. संचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२) मा. अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई